**कृपया प्रसिद्धिसाठी** **13 जुलै 2010**

## त्वरीत गॅस पुरवठ्यासाठी ज्यादा आकार ही मागील दाराने दरवाढ : राम नाईक

**मुंबई, मंगळवार :** "त्वरीत गॅस पुरवठ्यासाठी ज्यादा आकार ही मागील दाराने केलेली आणखी दरवाढ असून ही चक्क लूटच आहे. गॅस वितरणातील सध्याचा भ्रष्टाचार यामुळे आणखी वाढेल", अशी संतप्त प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली.

त्वरीत गॅस पुरवठ्यासाठी ज्यादा आकार योजना सुरु झाल्यावर गॅस वितरक कृत्रिम टंचाई निर्माण करतील, असे मत व्यक्त करुन श्री. राम नाईक पुढे म्हणाले, "वाजपेयी सरकार नागरिकांना गॅसची नवी जोडणीही तात्काळ पुरवत होती. सिलेंडरसाठी 24 तासांहून विलंब होत नसे. तात्काळ सिलेंडर हा ग्राहकाचा हक्क आणि आवश्यकता असताना आता त्यासाठी ग्राहकांना दहा टक्क्यांहून अधिक दर द्यावा लागणार आहे. पूर्वी वितरक एक दिवसच दुकान बंद ठेवत. आता शनिवार - रविवार दोन्ही दिवस सुट्टी मानून त्यासाठी अतिरिक्त भार आहे ही चक्क फसवणूक आहे. त्यात तात्काळ मागणी लेखी किंवा ईमेलने करायची म्हणजे तळागाळातील ग्राहक त्यापासून वंचितच राहाणार. तेव्हा तात्काळ पुरवठ्यासाठीचा ज्यादा आकार सरकारने ताबडतोब मागे घेतला पाहीजे."

**(कार्यालय सचिव)**